# बृहन्मुंबई महानगरपालिका

## घन कचरा व्यवस्थापन खाते

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत

## पोटकलम ४(१) (बी) अन्वये

## *घन कचरा व्यवस्थापन* खात्याची माहिती

नियमपुस्तिका - ८

**घन कचरा व्यवस्थापन खात्याचा एक भाग म्हणून किंवा खात्याच्या सल्लमसलतीच्या उद्देशाने, प्रस्थापित करण्यात आलेलया दोन किंवा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या मंडळे, परिषदा, समित्या आणि अन्य संस्थांचा तक्ता आणि या मंडळे, परिषदा, समित्या आणि अन्य संस्थांच्या बैठका नागरिकांसाठी खुल्या आहेत काय किंवा अशा बैठकांची इतिवृत्ते नागरिकांना उपलब्ध होण्याजोगी आहेत काय ?**

(दि. ३१.३.२०१५ पर्यंत सुधारीत)

**<u>घन कचरा व्यवस्थापन खात्याचा एक भाग म्हणून किंवा खात्याच्या सल्लामसलतीच्या उद्देशाने, प्रस्थापित करण्यात आलेल्या दोन किंवा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या मंडळे, परिषदा, समित्या आणि अन्य संस्थांचा तक्ता आणि या मंडळे, परिषदा, समित्या आणि अन्य संस्थांच्या बैठका नागरिकांसाठी खुल्या आहेत काय किंवा अशा बैठकांची इतिवृत्ते नागरिकांना उपलब्ध होण्याजोगी आहेत काय ?</u>**

जैविक कच-याचे संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट लावण्यासंदर्भात येणा-या विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी एक जैविक कचरा सल्लागार समितीचे गठण करण्यात आले आहे. या समितीमध्ये महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन आणि आरोग्य खात्याचे अधिकारी तसेच अग्नी, एम.एम.अे.जी. यासारख्या बिन सरकारी संस्था, एम.पी.सी.पी. चे अधिकारी व जैविक कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेने नियुक्त केलेले वहातुकदार, दवाखाने व नर्सिंग होम यांच्या संघटना आहेत.जैविक कच-याचे संकलन, वहातूक आणि विल्हेवाट लावण्या संदर्भाच्या समस्या दूर करण्यासाठी या समितीची महिन्यातून एकदा बैठक होते.

मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन खात्याचे अधिकारी आणि देवनार क्षेपणभूमीच्या परिसरात राहाणा-यांची एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. देवनार क्षेपणभूमीवरील दुर्गंधी, धूळ, आगी योचे व्यवस्थीत नियोजन व नियंत्रण या बाबतच्या व्यवस्थापनाचे ही समिती पुनर्विलोकन करते. क्षेपणभूमीवरील कार्यपध्दतीचे प्रत्यक्ष पर्यवेक्षण करण्यासाठी सदर समितीचे सदस्य सतत फे-या मारतात. या समितीची आठवडयातून एकदा किंवा पधरवडयातून एकदा बैठक होते.

अशाच प्रकारच्या समित्या गोराई आणि मुलुंड येथील क्षेपणभूमींसाठी स्थापन करण्यात आलेल्या आहेत त्या सुध्दा आठवडयातून एकदा किंवा पंधरवडयातून एकदा याबाबतचे पुनर्विलोकन करतात.